**शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची प्रवेश प्रक्रिया व इतर ऑनलाईन प्रणाली महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळामार्फत विकसित करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग**
**शासन निर्णय, क्रमांक : आयटीआय- २०२६/प्र.क्र. ४८/संगणक क्र. १६१८५२१/व्यशि-३**
**दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**
**दिनांक : ०८ मे, २०२६**

वाचा :- १. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र का. क्र. १६/प्रवेश/ २०२६/१७८ दि. २०.३.२०२६

२. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र का. क्र. १६/ २०२६/ प्रवेश प्रस्ताव /१९२ दि. २०.४.२०२६

**प्रस्तावना :**

राज्यातील शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रवेश प्रणाली केंद्रीय ऑनलाईन प्रणालीमार्फत (Online Admission Management System) राबविण्यात येते. तसेच संस्था संलग्नता प्रणाली (Online Application for New Private Institution and Expansion of Existing Private Institute) व तासिका तत्त्वावर निदेशक नियुक्ती प्रणाली (Online CHB Management System) ऑनलाईन विकसित करण्यात आलेली आहे. सदर प्रणाली खाजगी संस्थेमार्फत राबविण्यात येत असल्याने त्यावर मोठया प्रमाणात खर्च होत असून इतर मॉडयूल्स विकसित व अद्ययावत करण्याकरीता अतिरिक्त शुल्क लागत आहे तसेच विविध कामकाजासाठी खाजगी संस्थेवर अवलंबून राहावे लागत आहे. त्यामुळे सदर प्रणाली विभागांतर्गत विकसित केल्यास त्याचा वापर केवळ प्रवेशप्रक्रियेकरीता न राहता विभागांतर्गत ऑनलाईन तांत्रिक सेवांकरीता त्याचा उपयोग वर्षभर होणार आहे. तसेच तांत्रिक सेवांकरीता खाजगी संस्थेवर अवलंबून न राहता विभागांतर्गत सेवा पुरवणे शक्य होणार आहे. त्यामुळे खाजगी संस्थेवरचे अवंलबित्व संपुष्टात येणार आहे. यास्तव सदर प्रणाली विभागांतर्गतच महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळामार्फत विकसित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :**

राज्यातील शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील सन २०२६-२७ प्रवेश सत्राकरिता केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रणाली (Online Admission Management System), संस्था संलग्नता प्रणाली (Online Application for New Private Institution and Expansion

of Existing Private Institute) व तासिका तत्त्वावर निदेशक नियुक्ती प्रणाली (Online CHB Management System) विकसित करण्यास संचालक, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळास मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रणाली विकसित करण्याकरीता बाह्ययंत्रणेद्वारे तांत्रिक मनुष्यबळ कंत्राटी स्वरूपात घेण्यास व इतर सेवांकरीता आवश्यक खर्च रु. १,८७,२०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी सत्तेऐंशी लाख वीस हजार रुपये फक्त) इतक्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे. सदर खर्च प्रवेश प्रक्रियेच्या शुल्कापोटी संचालनालयाच्या स्विय प्रपंची खात्यामधून जमा होणाऱ्या रक्कमेतून (PLA) करण्यात यावा. स्वीय प्रपंजी खाते रिझर्व बँक ऑफ इंडिया, मुंबई येथे असून त्याचा खाते क्र.०१५१४७०१०५५ असा आहे.

उक्त खर्च वित्तीय अधिनियम पुस्तिका १९७८ मधील तरतूदीनुसार वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/२०१३/ विनिमय, भाग-२, दि.१७.०४.२०१५ अनुसार करण्यात यावा. माहिती व तंत्रज्ञान विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाचा अवलंब करण्यात यावा. तसेच बाह्यस्त्रोतामार्फत मनुष्यबळ/सेवा घेताना वित्त विभागाच्या प्रचलित धोरणास अनुसरुन कार्यवाही करण्याची खातरजमा संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांनी करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२६०५०८१७२४३१७२०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

AMEY ANIL GAWADE

Digitally signed by AMEY ANIL GAWADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SEEID, 2.5.4.20=20B5439BF6337AC786ACB2D216DFFF86804484EB90F4D3512213F2618F39657E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=11EB206D5E1B6D85776EB1F62A6FADEF79AFB18099A51B276758D0FFAA4C4F30, cn=AMEY ANIL GAWADE
Date: 2026.05.08 17:25:43 +05'30'

**( अमेय गावडे )**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत ,**

१. मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई
३. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. संचालक महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुलुंड, मुंबई उपनगर

५. सहसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय,मुंबई / नाशिक /पुणे /औरंगाबाद / अमरावती/नागपूर (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत)

६. संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, ( व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत )

७. निवड नस्ती. (व्यशि-३).